**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती विशेष सभा क्रमांक :- १०**

नगरसचिव कार्यालय
दिनांक :- ५/११/२०१२

प्रति,
मा. -------------------------------------

स्थायी समिती, सदस्य
अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील अनुसुची "ड" प्रकरण २ नियम ३(क) अन्वये अहमदनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची **विशेष सभा क्र.१० बुधवार दि.७/११/२०१२ रोजी दुपारी १.०० वाजता** महानगरपालिका नवीन प्रशासकीय इमारत, औरंगाबाद रोड येथील **मा.स्थायी समिती सभागृह कार्यालयात** खालील विषयावर विचार-विनीमय करण्यासाठी बोलविण्यांत आलेली आहे.

तरी सदर सभेत आपण उपस्थित रहावे हि विनंती.

सही /-
प्र.नगरसचिव,
मा.सभापती साहेब यांच्या आदेशान्वये अहमदनगर महानगरपालिका.

**बुधवार दिनांक-७/११/२०१२ ची विषय पत्रिका.**

| **विषय क्र.** | **विषय सुची** |
|---|---|
| ५० | अहमदनगर महानगरपालिका हद्दीत सन २०१२-२०१३ या वर्षाकरिता मा. महासभा ठराव क्र. १३ दिनांक ११/७/२०१२ अन्वये किमान देकार रक्कम रूपये २८ कोटी निश्चित करून पारगमन शुल्क वसुली कामी अभिकर्ता नियुक्ती करिता जाहिर ई टेंडर निविदा मागविल्या असता त्यास काहीही प्रतिसाद मिळलेला नसल्याने पारगमन शुल्क रक्कम रूपये १९,९७,६७,३७४/- निश्चित करून त्यानुसार फेर निविदा मागविणेस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ५१ | अहमदनगर महानगरपालिकेचे पारगमन नाक्याकरिता सोलापुर रोड- जामखेड रोड व पाथर्डी रोड येथील संबंधीत ग्रामपंचायत हद्दीमधील खाजगी खुल्या जागा भाडेतत्वावर घेणेस व भाडे रक्कम निश्चित करणेस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ. |

सही /-
प्र.नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका

सोबत- विषय क्रमांक- ५० ते ५१ च्या प्रस्तावाच्या झेरॉक्स प्रती

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती विशेष सभा क्रमांक- १०**

विषय क्रमांक- ५० बुधवार दिनांक ७/११/२०१२

ठराव क्रमांक - ५० बुधवार दिनांक ७/११/२०१२

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका हद्दीत सन २०१२-२०१३ या वर्षाकरिता मा. महासभा ठराव क्र.१३ दिनांक११/७/२०१२ अन्वये किमान देकार रक्कम रूपये २८ कोटी निश्चित करून पारगमन शुल्क वसुली कामी अभिकर्ता नियुक्ती करिता जाहिर ई टेंडर निविदा मागविल्या असता त्यास काहीही प्रतिसाद मिळलेला नसल्याने पारगमन शुल्क रक्कम रूपये १९,९७,६७,३७४/- निश्चित करून त्यानुसार फेर निविदा मागविणेस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अ.नगर मनपा जकात विभाग दिनांक २९/१०/२०१२

विषय-सन २०१२-१३ या वर्षाकरीता पारगमन शुल्क संकलन करणेकामी अभिकर्ता नेमणुकी बाबत.

सादर,

अहमदनगर महानगरपालिकेने मा.महासभा ठराव क्र.१३दि.११.७.२०१२अन्वये पारगमन शुल्का करिता अभिकर्ता नेमणेकामी १)जा.क्र.१८९ दि.८.८.२०१२,२)जा.क्र.जकात/२२५दि. १७.९.२०१२ आणि ३) जा.क्र. जकात / ३३० दि. ९.१०.२०१२ अन्वये महानगरपालिकेच्या संकेत स्थळावरुन व स्थानिक, जिल्हास्तरीय व राज्यस्तरीय वर्तमानपत्रांतुन जाहिर ई टेंडर निविदा प्रसिध्दीस दिली असता त्यास काहीही प्रतिसाद मिळालेला नसुन एक ही निविदा प्राप्त झालेली नाही.

निविदा प्रकरणी मा. शासनाकडील दि. १९ एप्रिल २०११ चे प्राप्त निर्देशामधील निर्देश क्र. २ (११) नुसार फेर निविदे नंतर ही किमान देकार रक्कमेपेक्षा देकार कमी आल्यास किमान देकार रक्कमेची योग्य प्रकारे परिगणना झाली आहे किंवा नाही याची फेर तपासणी करावी व परिस्थितीनुरुप किमान देकार रक्कमेची फेर निश्चीती करुन नव्याने निविदा प्रक्रिया हाती घेण्यात यावी अशाबाबत निर्देश दिलेले आहेत.

अहमदनगर महानगरपालिकेने सन २००५-०६,२००६-०७,२००७-०८ तसेच २००९-१० , २०१०-११ व २०११-१२ मध्ये जकात व पारगमन शुल्क वसुलीकरीता अभिकर्ता नेमणुक करताना जकात व पारगमन शुल्का पासुन मिळणा-या उत्पन्नाची एकत्रीत उलाढाल विचारात घेऊन त्यानुसार किमान देकार रक्कम निश्चीत करुन निविदा प्रक्रिया पुर्ण केलेल्या आहेत. त्यामुळे केवळ पारगमन शुल्कापासुन प्राप्त होणा-या उत्पन्नाबाबतची अधिकृत माहिती उपलब्ध नसल्याने किमान देकार रक्कम निश्चीत करताना आधार म्हणुन अहमदनगर महानगरपालिकेने पारगमन शुल्काचे दैनंदीन उलाढालीची माहिती प्राप्त करुन घेण्याकरीता जा.क्र./आस्थापना/४७४९ दि.१२.१०.१२ अन्वये महानगरपालिकेच्या पारगमन शुल्क वसुली नाक्यावर ३ शिप्टमध्ये कर्मचा-यांच्या नेमणुका केलेल्या असुन त्यांचे मार्फत दि.१३.१०.२०१२ पासुन सर्व नाक्यावरुन पारगमन शुल्का पासुन प्रत्यक्ष मिळणा-या दैनंदीन उत्पन्नाबाबतची माहिती संकलीत करुन घेण्यात आलेली आहे.

वरील प्रमाणे महानगरपालिकेच्या कर्मचा-यांनी पारगमन शुल्क वसुली नाक्यावर दि.१३.१०.२०१२पासुन ते दि.२८.१०.२०१२अखेर या १६ दिवसांमध्ये प्रत्यक्ष केलेल्या पारगमन शुल्काचे सर्व्हेनुसार सोबत जोडलेल्या तक्त्यानुसार माहिती संकलीत करण्यांत आलेली आहे.

महानगरपालिकेने दि.१३.१०.२०१२ ते २८.१०.२०१२ या कालावधीमध्ये कर्मचा-यांमार्फत जकात नाक्यावर पारगमन शुल्काची दैनंदीन माहीतीचा सर्व्हे करण्यात आलेला असुन त्यानुसार पारगमन शुल्का पासुन वार्षीक अंदाजे रक्कम रु.२०,६६,८४, ९००/- होत असल्याचे निदर्शनास येते.

महानगरपालिकेच्या कर्मचा-यांमार्फत पारगमन शुल्क वसुली केल्यास कर्मचा-यांचे पगार व त्यासाठीचा मेंटेनन्स खर्च ही महानगरपालिकेस करावा लागणार आहे, त्यामुळे महानगरपालिकेस पारगमन शुल्क वसुलीपासुन निव्वळ उत्पन्न पुढील प्रमाणे मिळेल.

| | | |
|---|---|---|
| **मनपा कर्मचा-यांच्या सर्व्हेनुसार अंदाजे पारगमन शुल्कची वसुली -** | | **रु. २०,६६,८४,९००/-** |
| **वजा कर्मचा-यावरील वार्षीक आस्था.** | | **खर्च रु. १,४८,९२,०००/-** |
| | **एकुण** | **रु. १९,१७,९२,९००/-** |
| **वजा मेटेनन्स चार्ज** | | **रु. २५,२०,०००/-** |
| | **एकुण** | **रु. १८,९२,७२,९००/-** |

यानुसार पारगमन शुल्का पासुन निव्वळ रक्कम **रु.१८,९२,७२,९००/-** वार्षिक प्राप्त होणे अपेक्षीत आहे.

परंतु मा. शासनाकडील दि. १९ एप्रील २०११ चे परीपत्रकातील मार्गदर्शक तत्व १ (ब) प्रथम वर्षाची किमान रक्कम (अ) मध्ये विशद केल्याप्रमाणे निश्चीत केल्यानंतर पुढील प्रत्येक वर्षासाठी त्या पुर्वीच्या वर्षी जास्तीत जास्त ज्या रक्कमेचा देकार प्राप्त झाला होता व ज्या रक्कमेस जकात / पारगमन शुल्क वसुलीचा ठेका निश्चीत करण्यात आला होता त्या रक्कमेत १५ टक्के वाढ करण्यात यावी व ही रक्कम किमान देकार रक्कम म्हणुन निश्चीत करण्यात यावी.

उपरोक्त दोन्ही परिस्थितीत किमान देकार रक्कम काढण्याबाबतच्या सुचना या केवळ महानगरपालिकांना त्यांच्या संभाव्य जकात उत्पन्न वाढी बाबतीत मार्गदर्शक सुचना आहेत , स्थानिक परिस्थितीनुसार यापेक्षाही जास्त रक्कमेचा देकार प्राप्त झाल्यास महानगरपालिकांनी तो देकार स्विकारणे अपेक्षीत व आवश्यक आहे.किमान देकार रक्कम निश्चीतीकरणा बाबतीतल्या सुचना ह्या महानगरपालिकंसाठी मार्गदर्शक सुचना आहेत, त्यामुळे भविष्यात अभिकर्त्याला या सुचनांचा आधार्घेऊन कोणताही वाद उपस्थीत करण्याचा अधिकार राहणार नाही. अशाबाबत निर्देश आहेत.

मा. शासन अधिसुचना दि. १.६.२०१२ नुसार जकाती ऐवजी स्थानिक संस्था कर लागु झाला तेव्हा मे. विपुल ऑक्ट्राय सेंटर यांना मासिक देकार रक्कम रु. १७,३७,१०,७६० /- इतकी ठरवुन पारगमन शुल्क वसुली करणेस परवानगी देण्यात आलेली आहे, त्यास मा. महासभा ठराव क्र. १३ दि. ११.७.२०१२ अन्वये पुढील एजन्सी नेमणेत येई पर्यंत त्यास मंजुरी देण्यात आली आहे. या देकारा नुसार सध्याचे अभिकर्ता यांची पारगमन शुल्क वसुली चालु आहे, त्यामुळे उपरोक्त परिपत्रकाचे मार्गदर्शक तत्व १(ब) अन्वये मागील वर्षाच्या ठेक्याचे देकार रक्कमेत १५% वाढ केल्यास किमान देकार पुढील प्रमाणे होईल.

**मागील वार्षीक ठेका रक्कम रु. १७,३७,१०,७६० /-**
**+ १५ % वाढ = २६०५६६१४ /-**

**-------------------------**

**एकुण रु. =१९,९७,६७,३७४ /-**

मा. शासनाच्या परिपत्रकानुसार येणारी किमान देकार रक्कम जास्त असल्याने यावर्षासाठी किमान देकार रक्कम **रु.१९९७६७३७४/-** इतकी निश्चीत करणे योग्य होईल.

तथापी यापुर्वी सन २०१२-१३ करीता पारगमन शुल्काची किमान देकार रक्कम रु. २८ कोटी ही रक्कम मा. सर्वसाधारण सभेने ठराव क्र. १३ दि. ११.७.२०१२ अन्वये निश्चीत केलेली असल्याने वरील प्रमाणे किमान देकार रक्कमेची फेर निश्चीती करुन नव्याने निविदा प्रक्रिया हाती घेण्याबाबत निर्णय घेण्यास्तव मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधि. १९४९ अनुसुची `ड`मधील प्रकरण ८ कराधान नियम ३५ अन्वये मा. स्थायी समितीची मंजुरी घेणे अत्यावश्यक आहे .

त्यानुसार किमान देकार रक्कम मान्यतेकरिता व त्यानुसार फेरनिविदा मागविण्याचा प्रस्ताव मा.स्थायी समितीपुढे निर्णयास्तव ठेवण्यास मान्यतेस्तव सादर.

येणेप्रमाणे जकात अधिक्षक यांचा अहवाल असे.

--**--

यावर मुख्य लेखा परिक्षक यांचा अभिप्राय की,मा.शासन परिपत्रक क्र.जकात-२०११/प्र.क्र.११/नवि-२४ दिनांक १९ एप्रिल २०११ मधील तरतुद १(ब) प्रमाणे किमान देकार रक्कम रू.१९९७६७३७४/- (एकोणवीस कोटी सत्याण्णव लक्ष सदुसष्ट हजार तीनशे चौ-याहत्तर) निश्चित करणेबाबत मा.स्थायी समितीचे मंजूरीस सादर करणे उचित वाटते. पुढील आदेशार्थ सादर.

यावर मुख्य लेखा अधिकारी यांचा अभिप्राय की, मा. मुख्यलेखापरिक्षक यांच्या अभिप्रायाप्रमाणे फेरनिविदा मागविण्याचा प्रस्ताव मा.स्थायी समितीपुढे सादर करणेस आदेशार्थ सादर.

यावर उपायुक्त (सा.) यांचा अभिप्राय की, प्रस्तावीतप्रमाणे पारगमन शुल्क वसुलीसाठीची किमान रक्कम निश्चितीसाठी व फेरनिविदा मागविण्यास निर्णयास्तव मा.स्थायी समितीपुढे प्रस्ताव ठेवण्यास मान्यतेस्तव सादर.

यावर आयुक्त साहेब यांची अभिप्राय की, प्रस्तावीत केलेनुसार मान्य त्यानुसार मे. स्थायी समितीचे निर्णयार्थ सादर करा. दि.२/११/२०१२

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- मनपा हद्दीत पारगमन शुल्क वसुली कामी मा. महासभेचे निर्णयानुसार जाहिर निविदा मागविल्या असता त्यास प्रतिसाद न मिळल्याने पारगमन शुल्क रक्कम रूपये १९,९७,६७,३७४/- निश्चित करून फेर निविदा मागविणेस मंजूरी देणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. डागवाले कि.आ. :- देकार रक्कम १९,९७,६७,३७४/- कशी काढली ते सांगावे.

मा.श्री. भोसले ग. पुं. :- म.न.पा. कर्मचा-यामार्फत केलेल्या सर्व्हेची आकडेवारी सांगावी.

मा.उपायुक्त (सा) डॉ.श्री. डोईफोडे साहेब :- पारगमन शुल्क वसुली कामी मनपाचे कर्मचा-यामार्फत १५दिवस सर्व्हे केला असता पारगमन शुल्काची रक्कम रू.२०६६८४९००/-अशी आली. त्यामधून आस्थापना खर्च मेन्टेनन्स चार्ज वजा करता पारगमन शुल्कापासून रूपये १८९२७२९००/-वार्षिक अपेक्षीत रक्कम आली.मा.शासनाचे परिपत्रकानुसार प्रथम वर्षाची पारगमन शुल्क ठेका रक्कम रू. १७३७१०७६०/-व या रकमेत अधिक १५% वाढ करून आलेली रक्कम रूपये १९९७६७३७४/- हि सर्व्हेच्या रकमेपेक्षा जास्त आल्याने जास्तीची रक्कम हि देकार रक्कम काढली आहे.

मा.श्री.डागवाले कि.आ.:-पारगमन शुल्क देकार रक्कम रू.२८कोटी धरली तेव्हा प्रशासनाने ही वस्तुस्थिती दाखविली असती तर हि वेळ आली नसती काही ठराव प्रशासन विखंडीत करते या वेळी तसे का केले नाही.

मा.श्री. सातपुते दि.ना. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.श्री. शेख अरिफ शे.र. :- तरीही प्रतिसाद मिळाला नाही तर काय ?

मा.उपायुक्त (सा.) डॉ.श्री. डोईफोडे साहेब :- आज कसे सांगता येईल.

मा.श्री.डागवाले कि.आ.:-देकार रक्कम वाढवून निविदा मागविल्या असता प्रतिसाद न मिळल्याने मा. शासनाचे निर्णयाप्रमाणे आलेले देकार रकमेस मंजूरी द्यावी. तसेच म.न.पा. कर्मचा-या मार्फत पारगमन शुल्क वसुलीची तयारी ठेवावी.

मा.श्री. भोसले ग. पुं. :- या रकमेस ही कुणी प्रतिसाद न दिल्यास प्रशासनामार्फत पारगमन शुल्क वसुलीची तयारी प्रशासनाने ठेवावी. ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सौ. खरमाळे सं.र :- या निविदास प्रतिसाद न मिळल्यास प्रशासनाने कर्मचारी तयार ठेवावेत. ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सौ. गायकवाड नि.व. :- मा. शासनाचे निर्णयाप्रमाणे आलेले देकार रकमेस मंजूरी द्यावी. तसेच म.न.पा. कर्मचा-या मार्फत पारगमन शुल्क वसुलीची तयारी ठेवावी.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करण्यात यावा. मात्र पारगमन शुल्क वसुली कामी जाहिर निविदा मागवून ही त्यास प्रतिसाद न मिळाल्यास पारगमन शुल्क वसुली कामी म.न.पा.ची आवश्यक ती यंत्रणा तयार ठेवावी.

**<u>ठराव :-</u>** अहमदनगर महानगरपालिका हद्दीत सन २०१२-२०१३ या वर्षाकरिता मा. महासभा ठराव क्र.१३ दिनांक११/७/२०१२ अन्वये किमान देकार रक्कम रूपये २८ कोटी निश्चित करून पारगमन शुल्क वसुली कामी अभिकर्ता नियुक्ती करिता जाहिर ई टेंडर निविदा मागविल्या असता त्यास काहीही प्रतिसाद न मिळाल्याने मा.शासनाचे परिपत्रकानुसार पारगमन शुल्क रक्कम रूपये १९,९७,६७,३७४/-(रू.एकोणवीस कोटी सत्याण्णव लाख सदुसष्ट हजार तीनशे चौ-याहत्तर) निश्चित करून त्यानुसार फेरनिविदा मागविणेस मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

मात्र पारगमन शुल्क वसुली कामी जाहिर निविदा मागवून ही त्यास प्रतिसाद न मिळाल्यास पारगमन शुल्क वसुली करीता आवश्यक ते कर्मचारी तयार ठेवावेत.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.सौ.खरमाळे संगीता रत्नाकर सही /-

अनुमोदक :- मा.सौ. गायकवाड निलीमा वसंतराव सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती ,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती विशेष सभा क्रमांक- १०**

विषय क्रमांक- ५१ बुधवार दिनांक ७/११/२०१२

ठराव क्रमांक - ५१ बुधवार दिनांक ७/११/२०१२

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे पारगमन नाक्याकरिता सोलापुर रोड- जामखेड रोड व पाथर्डी रोड येथील संबंधीत ग्रामपंचायत हद्दीमधील खाजगी खुल्या जागा भाडेतत्वावर घेणेस व भाडे रक्कम निश्चित करणेस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अ.नगर मनपा नगररचना विभाग दिनांक २३/१०/२०१२

सादर,

विषय- सोलापुर रोड- जामखेड रोड व पाथर्डी रोड येथील जकात नाक्याकरिता भाडेतत्वावर ध्यावयाच्या खुल्या जागेचे भाडे दर निश्चित करून पुढील कार्यवाही करणेबाबत.

उपरोक्त विषयान्वये विनंती रिपोर्ट सादर करण्यात येतो की, अहमदनगर महानगरपालिकेचे वरील रस्त्यावर असणारे विद्यमान जकात नाके कटक मंडळ भिंगार अहमदनगर यांनी त्यांच्या हद्दीमध्ये अहमदनगर महानगरपालिकेचे सोलापुर रोड जामखेड रोड व पाथर्डी रोड येथील पारगमन शुल्क वसुली नाके दिनांक १८/०९/२०१२ रोजी सिल करून ताब्यात घेतली आहे.

सदर कार्यवाहीमुळे अहमदनगर महानगरपालिकेचे मोठया प्रमाणात आर्थिक नुकसान होत आहे. त्यामुळे सदर जकात नाके लगतच्या ग्रामपंचायत हद्दीमध्ये पारगमन शुल्क वसुली करिता नाके उभारून सोलापुर रोडवरील नाक्यावर दिनांक २२/०९/२०१२ पासुन पाथर्डी रोड नाक्यावर दिनांक २५/०९/२०१२ रोजी तसेच जामखेड रोड नाक्यावर दिनांक २६/०९/२०१२ पासुन संबंधित ग्रामपंचायत हद्दीमध्ये संदर्भिय जागा मालक यांच्या सहमतीने पारगमन शुल्क वसुली नाक्याकरिता सोलापुर रोड नाक्याकरिता १०५०चौ.मी. व जामखेड रोड व पाथर्डी रोड नाक्याकरिता प्रत्येकी ५ गुंठे याप्रमाणे खाजगी खुल्या जागा उपलब्ध करून घेतल्या असुन उक्त जागेवर तात्काळ नविन नाके कार्यरत करण्यात येउन पारगमन शुल्क वसुली सुरू करण्यात आलेली आहेत.

पारगमन शुल्क वसुली करिता उक्त खुल्या जागा भाडेतत्वार कराराने ध्यावयाच्या असल्याने सदर खुल्या जागेचे दरमहा भाडे निश्चिती करिता इकडेस जकात विभाग जा.क्र.२३१ दिनांक २७/०९/२०१२ रोजी पत्राद्वारे कळविण्यांत आलेले आहे.

१] नगर- जामखेड रोड येथील जकात नाक्याकरिता दरेवाडी स.नं. १६८ हिस्सा क्र.१ बेरडपाटील मळा, येथील श्री. चंद्रकांत विव्दान बेरड व इतर पांच यांच्या मालकीची ५ गुंठे खुली जागा अहमदनगर महानगरपालिकेस जकात नाक्याकरिता भाडेतत्वावर ११ महिन्याच्या कराराने देण्यास सहमती दर्शविलेली आहे. तसेच त्यांनी त्याकरिता दरमहा २५,०००/- रूपये इतके भाडे अपेक्षिलेले आहे. सोबत जागेचा ७/१२ उतारा जोडलेला आहे.

२] नगर-पाथर्डी रोडवरील भिंगार स.नं. २३१/२अ मधील प्लॉ. क्र.४ या जागेचे मालक श्री. सुजीत मंच्छिंद्र रायकर व इतर एक यांच्या मालकीची ४५७.१२ चौ.मी. जागा भाडेतत्वावर अहमदनगर महानगरपालिकेच्या जकात नाक्याकरिता सहमती दर्शविलेली आहे. तसेच त्यांनी दरमहा रूपये २०,०००/- इतके भाडे अपेक्षिलेले आहे. सोबत जागेचा ७/१२ उतारा जोडला आहे.

३] नगर-सोलापुर रोडवरील दरेवाडी येथील स.नं. १४४/२ब या जागेचे मालक श्री. रामदास कोंडीराम गवळी यांच्या मालकीची १०५० चौ.मी. इतकी खुली जागा अहमदनगर महानगरपालिकेच्या जकात नाक्यास भाडेतत्वावर ११ महिन्याच्या कराराने देण्यास सहमती दर्शविलेली आहे. तसेच त्यांनी दरमहा रूपये ८०,०००/- इतके भाडे अपेक्षिलेले आहे. सोबत ७/१२ चा उतारा जोडला आहे.

त्यामुळे वरील संदर्भिय नगर-जामखेड , नगर-पाथर्डी व नगर-सोलापुर रोडवरील जागा जकात नाक्याकरिता भाडेतत्वावर ११ महिन्याच्या करारनाम्याने घ्यावयाच्या झाल्यास सन २०१२-२०१३ च्या शिघ्रगणकाच्या प्रचलीत बाजारमुल्याप्रमाणे त्याठिकाणी खुल्या जागेचा असणा-या दराप्रमाणे घेणे योग्य होईल असे मत आहे.

तथापी नगर-सोलापुर रोड व नगर-जामखेड रोडवरील जकात नाक्याच्या आजुबाजूचा परिसर मोठया प्रमाणावर विकसित झालेला असुन जकात नाक्या लगत व्यापारी संकुल झालेले आहे. त्यातील दुकानांचा प्रति चौ.मी. दर रूपये १३८००/- इतका आहे. त्यामुळे नगर-सोलापुर रोडवरील जकात नाका हा राज्य महामार्ग सन्मुख असुन हा भुखंड वाणिज्य वापराच्या दृष्टीने महत्वाचा आहे. त्यामुळे दुकानांकरिता (वाणिज्य) असणा-या दराच्या एकुण ७०% टक्के दराने भाडे मुल्य देणे योग्य होईल सोबत लगतच्या दुकानांचे झालेल्या व्यवहाराचे खरेदीखत जोडलेले आहे.

**नगर-सोलापुर रोड (दरेवाडी) स.नं. १४४/२ब या खुल्या जागेचे भाडेमुल्य खालील प्रमाणे**

**नगर- सोलापुर रोड**

१] जागेचे एकुण क्षेत्रफळ :- १०५० चौ.मी.

२] खुल्या जागेचा मुल्य दर :- रू.४०६०/- प्रति चौ.मी.

१]१०५० चौ.मी.x४०६०दर = एकुण ४२६३०००x१०% =वार्षिक भाडे रूपये ४२६३००÷१२ = दरमहा भाडे रूपये ३५५२५/-

सदर जकात नाक्याचे भाडे दरमहा रूपये ३५५२५/- इतके येते.

**नगर-जामखेड रोड (दरेवाडी) स.नं. १६८/१ पैकी या खुल्या जागेचे भाडेमुल्य खालील प्रमाणे**

**नगर- जामखेड रोड**

१] जागेचे एकुण क्षेत्रफळ :- ५०० चौ.मी.

२] खुल्या जागेचा मुल्य दर :- रू.४०६०/- प्रति चौ.मी.

१] ५०० चौ.मी.x४०६०दर = एकुण २०३००००x१०% =वार्षिक भाडे रूपये २०३०००÷१२ = दरमहा भाडे रूपये १६९१७/-

सदर जकात नाक्याचे भाडे दरमहा रूपये १६९१७/- इतके येते.

**नगर-पाथर्डी रोड (भिंगार) स.नं.२३१/२अ या बिनशेती खुल्या जागेचे भाडेमुल्य खालील प्रमाणे**

**नगर- पाथर्डी रोड**

१] जागेचे एकुण क्षेत्रफळ :- ४५७.१२ चौ.मी.

२] बिनशेती खुल्या जागेचा शिघ्रगणक मुल्य दर :- रू. १४००/- प्रति चौ.मी.

१]४५७.१२ चौ.मी.x१४००दर = एकुण ६३९९६८x१०% =वार्षिक भाडे रूपये ६३९९७÷१२ = दरमहा भाडे रूपये ५३३३/-

सदर जकात नाक्याचे भाडे दरमहा रूपये ५३३३/- इतके येते.

सबब वरील तिन्ही जकात नाक्याकरिता वर नमुद केलेले भाडे देणे उचित होईल असे मत आहे. तरी नगर-सोलापुर रोड, नगर-जामखेड रोड, नगर-पाथर्डी रोड या जकात नाक्याकरीत खुल्या जागा भाडे तत्वावर घेण्याचा प्रस्ताव जकात नाका विभाग, अहमदनगर महानगरपालिका यांचेकडे पुढील कार्यवाही करीता पाठविण्यात येत आहे.

येणेप्रमाणे नगररचनाकार यांचा अहवाल असे.

--**--

जकात विभाग २६८ दि.३/११/२०१२

विषय- सोलापुर रोड, जामखेड रोड व पाथर्डी रोड नाक्याकरीता खाजगी जागा भाडे तत्वावर घेणेबाबत.

फेरसादर,

कार्यालयीन आदेशान्वये सोलापुर रोड, जामखेड रोड व पाथर्डी रोड नाक्याकरीता प्रस्तावीत खाजगी खुल्या जागेकरीता नगररचना विभागाने शासकीय दरानुसार सुधारीत भाडे दर निश्चित करून जकात विभागाचे कार्यालयाकडेस पाठविलेले आहे.

अहमदनगर महानगरपालिकेस नाक्याकरीता उक्त खुल्या जागेची आवश्यकता असल्याने इतरत्र नाक्यासाठी जागेची उपलब्धता होईपर्यत संबंधीत जागा मालकानी त्यांचे मालकीच्या जागेकरीता शासकीय दरापेक्षा जास्त अपेक्षीत केलेली भाडे दराची मागणी मान्य करणे संयुक्तीक होईल, सदर प्रस्तावास मंजुरी मिळणेकरीता आदेशार्थ सादर तसेच सदर प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मंजुरीस्तव पाठविणे योग्य होईल, सबब आदेशार्थ सादर.

येणेप्रमाणे जकात अधिक्षक यांचा अहवाल असे.

यावर मुख्य लेखा परिक्षक यांचा अभिप्राय की, (१)सर्व्हे नं. १६८/१ चे जागा मालकाने दरमहा भाडयाची मागणी रू.२१०००/- केलेली आहे. तथापी शासकीय दर १६९१७/- आहे तफावत रू.४०८३/- आहे (वाढीव), (२) सर्व्हे नं.१४४/२ब चे जागा मालकाने दरमहा भाडयाची मागणी रू.६०,०००/- केलेली आहे. तथापी शासकीय दर रू. ३५५२५/- आहे. तफावत रू.२४४७५/- आहे (वाढीव), (३) सर्व्हे नं.२३१/२ चे जागा मालकाने दरमहा भाडयाची मागणी रूपये १२०००/- केलेली आहे. तथापी शासकीय दर रू.५३३३/- आहे तफावत रू.६६६७/- (वाढीव)

जकात / पारगमन या उत्पन्नाशी निगडीत बाबीशी दरमहा जागा भाडे देणेबाबत विषय हा धोरणात्मक स्वरूपाचा असल्याने मा.स्थायी समितीच्या मंजूरीने निर्णय घेणे योग्य वाटते. /**अ**

यावर मुख्य लेखा अधिकारी यांचा अभिप्राय की, सदरील प्रस्ताव मंजूरीस मा.स्थायी समितीसमोर ठेवणे योग्य वाटते.

यावर उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, प्रस्तावीत **"अ"** प्रमाणे संबंधित जागा मालकाकडून नाक्याच्या जागेचे सुधारीत मागणी भाडे व नगररचना विभागाच्या गणनेनुसारच्या भाडयात तफावत येत आहे. परंतु पारगमन शुल्क वसुलीसाठीच्या सदरील तिन्ही नाक्यांना कटक मंडळाद्वारे सील केले असल्याने मा.आयुक्त यांच्या सुचनेनुसार तात्काळ पर्यायी व्यवस्था म्हणून जागा मालकाशी प्राथमिक चर्चा करून नाके सुरू केलेले आहेत. चर्चे दरम्यान मा.स्थायी समिती मान्य करेल असे भाडे देण्यांत येईल असे ठरले होते.

परंतु संबंधितांच्या जागा भाडयाच्या मुळ मागणीसह नगररचनाकार यांच्या भाडे गणनेनंतरची सुधारित मागणीही जास्त वाटते. परंतु मनपाच्या अत्यावश्यकतेमुळे, आर्थिक नुकसान होउ नये म्हणून जागा ताब्यात घेउन नाके चालु केले असल्याने संबंधिताची सुधारित मागणी नगररचनाकार यांच्या भाडे गणनेसह निर्णयासाठी मा.स्थायी समितीपुढे ठेवणे योग्य वाटते. सबब त्यानुसारचा प्रस्ताव मा.स्थायी समितीपुढे ठेवण्यास मान्यतेस्तव सादर.

यावर आयुक्त साहेब यांची अभिप्राय की, प्रस्तावीत केलेनुसार मान्य दि.३/११/२०१२

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- म.न.पा.चे पारगमन नाक्याकरिता सोलापुर रोड , जामखेड रोड व पाथर्डी रोड येथील खाजगी खुल्या जागा भाडेतत्वावर घेणेस व भाडे रक्कम निश्चित करणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.सौ. खरमाळे सं.र. व मा.सौ. गायकवाड नि.व. :- सदर जागांची पहाणी कुणी केली आहे का ? जागा सिलेक्ट कुणी केल्या.

जकात अधिक्षक श्री. साबळे :- मा.आयुक्त , मा.उपायुक्त व जकात विभागाने सदर जागांची पहाणी केलेली आहे. त्यानुसार अहवाल सादर केला आहे.

मा.सौ. खरमाळे सं.र. :- कॅन्टोन्मेंट बोर्डाने याच वेळी अडवणूक का केली.

जकात अधिक्षक श्री. साबळे :- आपण त्याचे हद्दीत जकात नाके लाउन जकात वसुली करत होतो. त्यापोटी त्यांना जकात हिस्सा म्हणून रू.१.२९ कोटी देत होतो. पारगमन शुल्काचा त्यांनी रूपये ९० लाख हिस्सा मागितला होता तो आपल्या उत्पन्नाच्या ५ टक्के होतो. पारगमन शुल्काचा हिस्सा त्याना न दिल्याने त्यांनी आपले नाके सील केले होते.

मा.श्री. डागवाले कि.आ. :- पारगमन नाक्याकरिता जागा घेणेसाठी निविदा का मागविल्या नाहीत.

मा.उपायुक्त (सा.) डॉ.श्री. डोईफोडे साहेब :- कटक मंडळाने पारगमन शुल्काचे हिस्साचे मागणी केली होती. ती पुर्ण न केल्याने त्यांनी आपले नाके सील केले. उत्पन्न बुडायला लागल्याने आपले जकात नाके तातडीने चालू करणे आवश्यक होते. कटक मंडळाने अडवणूक केल्याने पारगमन नाक्याकरिता जामखेड रोड, सोलापूर रोड व पाथर्डी रोड वरील जागाची पहाणी करून जागा उपलब्ध करून घेतल्या तात्काळ नविन नाके कार्यरत करून पारगमन शुल्क वसुली सुरू करण्यांत आली.

मा.श्री. डागवाले कि.आ. :- सदर बाबत स्पर्धा झाली नाही. ज्या जागा पाहिल्या त्याच जागा नाक्याकरिता ठरविल्या या जागा मालकाच्या मागणीप्रमाणे आपण जागा भाडे देत आहोत. भाडे कसे ठरविले त्याची माहिती सांगावी.

नगररचनाकार श्री. दहे साहेब :- शिघ्रगणकाच्या प्रचलीत बाजार मुल्याप्रमाणे नगर-सोलापुर रोड दरेवाडी स.नं. १४४/२ ब या खुल्या जागेचे क्षेत्रफळ १०५० चौ.मी. बाजार मुल्य ४०६० प्रति चौ.मी. धरून दरमहा भाडे रू.३५५२५/- इतके येते, जागा मालकाने रूपये ६०,०००/- दरमहा जागा भाडे मागणी केली आहे. नगर- जामखेड रोड दरेवाडी स.नं. १६८/१ पैकी ५०० चौ.मी. बाजार मुल्य ४०६० प्रति चौ.मी. धरून दरमहा भाडे रू. १६९१७/- इतके येते. जागा मालकाने दरमहा रू.२१०००/- जागाभाडे मागणी केली आहे. तसेच नगर-पाथर्डी रोड भिंगार स.नं. २३१ पैकी ४५७.१२ चौ.मी. बाजार मुल्य १४०० प्रति. चौ.मी. दरमहा भाडे रू. ५३३३/- इतके येते आहे. सदर जागा मालकाने दरमहा रूपये १२०००/- जागा भाडे मागणी केली आहे.

मा.सभापती साहेब :- आपण काढलेल्या भाडे रकमेपेक्षा सदरचे जागा मालकांनी जास्तीचे भाडयाची मागणी केलेली आहे.

मा.सौ. खरमाळे सं.र. :- जागाची माहिती प्रशासनाला कशी कळाली दुस-या जागा नव्हत्या का ?

मा.उपायुक्त (सा.) डॉ.श्री. डोईफोडे साहेब :- पारगमन नाक्याकरिता जागा उपलब्ध करून घेते वेळी सदर जागा मालकांना मा.स्थायी समिती ठरविल त्याप्रमाणे दरमहा भाडे देणे बाबत ठरविले आहे सोलापुर रोडवर पहाणी करता जुना नाका व सध्याचा नाका या भागात कुठेही जागा उपलब्ध झाली नाही. जागे करिता वाकोडी हद्दीत जावे लागेल मा.सभेने जागा मालकाची मागणी शिघ्रगणकानुसार आलेले भाडे याचा मध्य साधून भाडे दर ठरवावा.

मा.श्री. डागवाले कि.आ. :- वर्तमान पत्रात जाहिरात देउन निविदा मागवाव्यात नविन जागा मालक आला तर फायदा होईल.सदर जागा मालकांची मागणी जास्त आहे त्यांना चर्चेसाठी बोलवा भाडे किती वाढवायचे ते सांगावे.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्टानुसार आलेले भाडे मंजूर करावे.

मा.श्री. जगताप नि.वि. **व** मा.श्री. कोतकर सु.स. **व** मा.श्री. शेख अरीफ शे.र. :- चर्चेसाठी सदर जागा मालकांना बोलवावे भाडे ठरविणे कामी कमेटी नेमणेत यावी.

मा.उपायुक्त (सा.) डॉ.श्री. डोईफोडे साहेब **व** मुख्य लेखा परिक्षक श्री. मेश्राम :- मा.सभेने भाडे ठरवावे. मा.सभेस १५% पर्यत भाडे वाढ घट करणेचे अधिकार आहेत. त्या नुसार दरमहा भाडे कमी जास्त करता येईल.

मा.श्री. डागवाले कि.आ. :- सदर जागा एक महिन्याकरिता शिघ्रगणक दर मुल्यानुसार येणारे भाडे रकमेत १५% वाढ करून भाडे निश्चित करण्यांस मंजूरी देण्यांत यावी आपले पारगमन नाक्याकरिता जागा मिळणेकरिता जाहिर निविदा मागविण्यांत याव्यात.

मा.श्री. कवडे उ.खं. :- सदर जागा एक महिन्याकरिता शिघ्रगणक दर मुल्यानुसार येणारे भाडे रकमेत १५% वाढ करून भाडे निश्चित करण्यांस मंजूरी देण्यांत यावी आपले पारगमन नाक्याकरिता जागा मिळणेकरिता जाहिर निविदा मागविण्यांत याव्यात.

मा.सौ. गंधे सु.मो. :- सदर जागा एक महिन्याकरिता शिघ्रगणक दर मुल्यानुसार येणारे भाडे रकमेत १५% वाढ करून भाडे निश्चित करण्यांस एक महिन्याकरिता मंजूरी देण्यांत यावी आपले पारगमन नाक्याकरिता जागा मिळणेकरिता जाहिर निविदा मागविण्यांत याव्यात.

मा.सभापती साहेब :- पारगमन नाक्याकरिता सोलापुर रोड, जामखेड रोड व पाथर्डी रोड येथील खाजगी खुल्या जागा भाडे तत्वावर घेणेकरिता शिघ्रगणकाच्या प्रचलीत बाजार मुल्याप्रमाणे येणारे दरमहा भाडयात १५% वाढ करून एक महिन्याकरिता सदर जागा भाडयाने घेण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत यावी. व पारगमन नाक्याकरिता नविन जागा भाडयाने घेणेकामी जाहिर निविदा मागविण्यांत याव्यात.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेचे पारगमन नाक्याकरिता सोलापुर रोड- जामखेड रोड व पाथर्डी रोड येथील संबंधीत ग्रामपंचायत हद्दीमधील खाजगी खुल्या जागाचे शिघ्रगणकाच्या प्रचलीत बाजार भावानुसार येणारे दरमहा भाडे रक्कमेत १५% वाढ करून एक महिन्याकरिता सदरच्या खुल्या जागाभाडे तत्वावर घेणेस मंजूरी देण्यांत येत आहे.

तसेच सदरचे पारगमन जकात नाक्याकरिता नविन जागा भाडयाने घेणेकामी जाहिर निविदा मागविण्यांत याव्यात. खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. कवडे उमेश खंडेराव सही /-

अनुमोदक :- मा.सौ. गंधे सुमन मोहनीराज सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका